त्यानंतर सूर्यकुमार यादव आणि विष्णू विनोद यांनी चौथ्या विकेटसाठी ६५ धावांची भागीदारी रचत मुंबईला १५ व्या षटकात १५० धावांपर्यंत मजल मारून दिली. मात्र २० चेंडूत ३० धावा करणाऱ्या विनोदची मोहित शर्माने विकेट घेत ही जोडी फोडली. त्यानंतर आलेला टीम डेव्हिड ५ धावा करून राशिद खानची शिकार झाला. मात्र दुसरीकडे आपल्या अर्धशतकाजवळ पोहचलेल्या सूर्यकुमार यादवने आपला गिअर बदलला होता. १७ व्या षटकात ४७ धावांपर्यंत पोहचलेल्या सूर्यकुमारने तुफान फटकेबाजी करण्यास सुरूवात केली. त्याने १८ व्या षटकात २०, १९ व्या षटकात १७, तर २० व्या षटकात १७ धावा चोपल्या. त्यामुळे मुंबईने २१८ धावा केल्या. सूर्याने ४९ चेंडूत ११ चौकार आणि ६ षटकार ठोकत नाबाद १०३ धावा केल्या. त्याने शेवटच्या चेंडूवर षटकार ठोकत आपले शतक पूर्ण केले. सूर्याचे हे आयपीएलमधील पहिले वहिले शतक आहे.

## आजचे सामने

2023 IPL

SUNRISERS HYDERABAD वि. LUCKNOW SUPER GIANTS
**वेळः ३.३०, हैद्राबाद**

DELHI CAPITALS वि. KINGS XI PUNJAB
**वेळः ७.३०, दिल्ली**

# विश्व मल्लखांब स्पर्धेत रुपालीचे शानदार यश



■ मुंबई

चेंबूर येथील लोकमान्य शिक्षण संस्था आणि शरद आचार्य क्रीडा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जवाहर विद्या भवन केंद्रात सराव करणाऱ्या रुपाली सुनील गंगावणेने भुतान येथे नुकत्याच संपन्न झालेल्या जागतिक मल्लखांब स्पर्धेत शानदार कामगिरी करताना भारताला २ सुवर्ण ३ रौप्य पदके पटकावून दिली. या कामगिरीबाबत रुपाली, तिचे प्रशिक्षक व वडील आंतरराष्ट्रीय पंच सुनील गंगावणे, प्रमुख मार्गदर्शक महेंद्र चेंबूरकर सर यांचे खास अभिनंदन लोकमान्य शिक्षण संस्था परिवाराकडून करण्यात आले.

# नंदुरबारमध्ये होणार भव्य खो-खो स्पर्धा

■ मुंबई

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने २०२३-२४ या वर्षातील कुमार-कुमारी (ज्युनियर) गटाची राज्य अजिंक्यपद खो खो स्पर्धा नंदुरबारमध्ये होणार असल्याची घोषणा महाराष्ट्र खो-खो संघटनेचे सरचिटणीस गोविंद शर्मा यांनी केली. त्याचबरोबर स्पर्धेसाठी निवड समिती सदस्य, प्रशिक्षक व फिजिओ यांची सुध्दा नियुक्ती जाहीर केली. साधारणपणे ही स्पर्धा ऑक्टोबर महिन्यामध्ये होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे. किरण मेटकरी (सांगली), सुनील चव्हाण (सोलापूर), मनोज परदेशी (नंदूरबार), सारिका जगताप (सातारा) यांचा कुमार-कुमारी गटांच्या निवड समितीत समावेश करण्यात आला आहे. कुमार गटाच्या प्रशिक्षकपदी प्रताप शेलार (ठाणे), सहाय्यक प्रशिक्षकपदी संतोष कर्नाळे (सांगली) आहेत. कुमारी गटाचे प्रशिक्षकपदी श्रीकांत गायकवाड (मुंबई), सहाय्यक प्रशिक्षकपदी सुप्रिया गाढवे (धाराशिव) आहेत. फिजिओ डॉ. अमित रव्हाटे (सांगली) असतील.

# सेंच्युरी रेयॉन संघ अंतिम फेरीत दाखल

■ ठाणे

सेंच्युरी रेयॉन संघाने झी इंटरटेनमेंट संघावर सात विकेट्सनी पराभव करत ठाणे वैभव आणि स्पोर्टिंग क्लब कमिटी आयोजित ३५ षटकांच्या ४७ व्या आंतर कार्यालयीन क्रिकेट स्पर्धेच्या 'क' गटात अंतिम फेरीत स्थान मिळवले. सेंट्रल मैदानात झालेल्या उपांत्य फेरीच्या लढतीत झी इंटरटेनमेंट संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी घेतली. मधल्या फळीतील फलंदाज वगळता इतरांनी सपशेल निराशा केल्याने झी इंटरटेनमेंटला ३३ षटकात १४४ धावांवर समाधान मानावे लागले. विशाल दीक्षितने संघासाठी सर्वाधिक ३७ धावांचे योगदान दिले.

प्रथमेश कडू (२९), निलंय डागा आणि दर्पण मेहताने प्रत्येकी १२ धावा केल्या. सामनावीर ठरलेल्या प्रदीप पांडे आणि रोशन जाधवने प्रत्येकी तीन विकेट्स मिळवत झी इंटरटेनमेंटच्या धावसंख्येवर अंकुश ठेवला. उत्तरादाखल सेंच्युरी रेयॉन संघाने ३०.४ षटकात ७ बाद १५१ धावसंख्येसह विजय मिळवला. विनय केणे (४०), प्रशांत तरणे (२६), प्रदीप पांडेने नाबाद २२ धावांची खेळी करत फलंदाजीत आपली उपयुक्तता सिद्ध केली.

# 'ब्रेबॉर्न' वर मुलींची क्रिकेट स्पर्धा

■ मुंबई

क्रिकेट क्लब ऑफ इंडियाच्या वतीने त्यांचे माजी अध्यक्ष माधव आपटे यांच्या स्मरणार्थ १५ वर्षांखालील मुलींच्या पहिल्या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. १५ ते १७ मे या कालावधीत ब्रेबॉर्न स्टेडियम येथे खेळविण्यात येणाऱ्या या स्पर्धेत मुंबईतील नामवंत सहा अकॅडमीचे संघ सहभागी होणार आहेत.या सहा संघांची दोन गटांत विभागणी करण्यात येणार असून, प्रत्येक संघाला किमान दोन साखळी सामने खेळण्याची संधी मिळणार आहे.

## जाहीर सूचना

जनतेच्या माहितीकरिता याद्वारे सर्व संबंधितांना सूचना देण्यात येते की, आमचे अशील श्रेयस इंडस्ट्रियल इस्टेट, गोरेगाव (पूर्व), मुंबई ४०० ०६३ येथे स्थित युनिट क्र. ए-१० (सदर युनिट)चे संपूर्ण आणि निःसंशय मालक आहेत.
सदर युनिटच्या संदर्भातील शीर्षक करारनाम्याची आधीची साखळी म्हणजेच (i) मे. श्रेयस बिल्डर्स ॲण्ड क्राऊन पॅकिंग कॉर्पोरेशन यांच्या दरम्यान बनलेले दिनांक २०.०४.१९७५ रोजीचे करारपत्र, (ii) मे. क्राऊन पॅकिंग कॉर्पोरेशन आणि श्री श्याम सुंदर अमिरचंद साहनी आणि श्री एस. एस. भाटिया यांच्या दरम्यान बनलेले दिनांक १५.०६.१९७७ रोजीचे करारपत्र, (iii) श्री श्याम सुंदर अमिरचंद साहनी आणि श्री सुंदर श्याम भाटिया आणि मे. प्रगती सिल्क मिल्स यांच्या दरम्यान बनलेले दिनांक ०५.०८.१९७७ रोजीचे करारपत्र, हरवली किंवा गहाळ झाली आहे आणि/किंवा अत्यंत परिश्रमपूर्वक शोधून देखील सापडत नाही.
सदर शीर्षक करारनाम्याच्या संदर्भात विक्री, अदलाबदल, गहाणवट, प्रभार, भेट, न्यास, कॉपीराईट दस्तऐवज, वारसा, ताबा, भाडेपट्टी, धारणाधिकार, देखबाल, वहिवाट, योजना, मृत्युपत्र किंवा बोजा मार्गे किंवा अन्य कशाही प्रकारे कोणताही दावा असणाऱ्या सर्व व्यक्तींना याद्वारे विनंती करण्यात येते की, त्यांनी त्याबाबत कागदोपत्री पुराव्यासह निम्नस्वाक्षरीकारांना सदर प्रसिद्धीच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत सूचित करावे. असे न केल्यास असे कोणतेही दावे दुर्लक्षित करण्यात येतील आणि सोडून दिले आणि/किंवा गुंडाळून ठेवले असे समजण्यात येईल.
दि. १३ मे, २०२३
सही/-
**सौ. पूनम साळसकर,**
वकील
१०७/बी विंग, सहारा क्लासिक,
सुबा इंटरनॅशनलसमोर, सहार रोड,
अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९९.

**रामेश्वर मीडिया**

## पश्चिम रेल्वे

### एडब्ल्यूएस ट्रॅक-डीव्हाईस उपकरणांचा पुरवठा आणि पुनःस्थापना

एडीएसटीई/डब्ल्यू-I/एमएमसीटी निविदा सूचना क्र. SG_623_1624_AWS_WA_R Dtd 11.05.2023, कामाचे नाव : पश्चिम रेल्वेच्या मुंबई विभागाच्या चर्चगेट - विरार उपनगर सेक्शनमध्ये एडब्ल्यूए ट्रॅक - डीव्हाइस इक्यूपमेंट एक्सेसरीज पुरविणे आणि पुनःस्थाना. कामाचे अंदाजित मूल्य : रु. ७६,६८,१७५.७५/-. जेथे ई-निविदा खुली होईल, त्या कार्यालयाचा तपशील : वरिष्ठ विभागीय संकेत आणि दूरसंचार अभियंता (दक्षिण), २ रा मजला, विभागीय रेल्वे व्यवस्थापकांचे कार्यालय, मुंबई सेंट्रल, मुंबई - ४०० ००८. **इसारा रक्कम ठेव :** रु. १,५३,४००.००/- **ई-निविदेचा प्रकार :** खुली ई-निविदा, ई-निविदा दस्तावेज सादरीकरण बंद होण्याची तारीख व वेळ : ०२.०६.२०२३ रोजी १५.०० वा., ई-निविदा उघडण्याची तारीख व वेळ : ०२.०६.२०२३ रोजी १५.३० वाजता. संकेतस्थळ : **http://www.ireps.gov.in** वर निविदा पाहू शकता. 0177

आम्हाला लाइक करा : facebook.com/WesternRly

## जाहीर सूचना

### कांदिवली येथे प्लॅटफॉर्म क्र. ४ येथे दक्षिण एफओबी आणि बृमुंमपा एफओबी जोडणारा विद्यमान स्कायवॉक बंद राहील

**कांदिवली येथे प्लॅटफॉर्म क्र. ४ येथे दक्षिण पादचारी पूल आणि बृमुंमपा पादचारी पूल जोडणारा विद्यमान स्कायवॉक प्रस्तावित बुकींग कार्यालयाचे समायोजन करण्यासाठी पाडणे आवश्यक आहे. म्हणून कांदिवलीचा स्कायवॉक दिनांक १६.०५.२०२३ पासून बंद राहील. प्रवाशांना होणाऱ्या गैरसोईसाठी मनःपूर्वक दिलगीर आहोत.**

पश्चिम रेल्वे
www.wr.indianrailways.gov.in
G20
Azadi Ka Amrit Mahotsav
0174

आम्हाला लाईक करा facebook.com/WesternRly • आम्हाला फॉलो करा : twitter.com/WesternRly

## फॉर्म पी11
### ठराव योजनांकरिता आमंत्रण
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (प्री-पॅकेज्ड दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०२१ च्या विनियमन ४३ अन्वये)

संबंधित तपशील

| I | II | III |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट धनकोचे नाव | सुदल इंडस्ट्रीज लिमिटेड |
| २. | पूर्वीचे नाव, जर गत दोन वर्षात बदलले असल्यास | लागू नाही |
| ३. | कॉर्पोरेट धनकोच्या स्थापनेचा दिनांक | ०८.०८.१९७९ |
| ४. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट धनकोची स्थापना/नोंदणीकरण झाले | आरओसी-मुंबई |
| ५. | ओळख क्रमांक | L21541MH1979PLC021541 |
| ६. | कॉर्पोरेट धनकोच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | **नोंद. कार्यालयः** ए-५, एमआयडीसी, अंबड इंडस्ट्रियल एरिया, मुंबई - नाशिक हायवे, नाशिक-४२२०१०, महाराष्ट्र, भारत. **कॉर्पोरेट कार्यालयः** २६ए, नरिमन भवन, २२७ नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१ महाराष्ट्र, भारत. |
| ७. | प्री-पॅकेज्ड दिवाळखोरी सुरु होण्याचा दिनांक | २०.०४.२०२३ (आदेश दिनांक २०.०४.२०२३ निम्नस्वाक्षरीकारांना दि. २२.०४.२०२३ रोजी प्राप्त) |
| ८. | ठराव योजनांकरिता आमंत्रणाचा दिनांक | १३.०५.२०२३ |
| ९. | ठराव अर्जदाराकरिता पात्रता | पात्रता निकष उपलब्धः सीडीची वेबसाईटः http://sudal.co.in/ आयपीईची वेबसाईटः http://ssarvi.com/running-cases.php वर |
| १०. | कलम २९ए अन्वये लागू अपात्रतेचे निकष | नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ च्या कलम २४०ए सह वाचावयाच्या कलम २९ए नुसार |
| ११. | मुल्यमापनाचा आधार (महत्त्वपूर्ण सुधारणा आणि टिकच्या आकाराशी संबंधित तपशीलासह) | मूल्यमापनाचे तपशीलवार आधार ठराव व्यावसायिकाकडून sudal.ppirp@gmail.com येथे ईमेल पाठवून प्राप्त करता येतील. |
| १२. | 'ठराव योजनेचे आमंत्रण', मूल्यमापनाकरिता आधार प्राप्त करण्याची पद्धत (महत्त्वपूर्ण सुधारणा आणि टिकच्या आकाराशी संबंधित तपशीलासह), माहिती ज्ञापन आणि अधिक माहिती | कागदपत्रे पात्रता निकषमध्ये नमूद केल्यानुसार अटींचे पालन करण्याच्या अधीन राहून, ठराव व्यावसायिकाकडून sudal.ppirp@gmail.com येथे ईमेल पाठवून प्राप्त करता येतील. |
| १३. | ठराव योजनांच्या सादरीकरणाकरिता अंतिम दिनांक | २९.०५.२०२३ |
| १४. | ठराव व्यावसायिकास ठराव योजना सादर करण्याची पद्धत | शोधण्यायोग्य स्वरुपामध्ये (संकेतशब्द संरक्षित) सॉफ्ट प्रतीसह मोहोरबंद पाकिटात भौतिक प्रत ठराव व्यावसायिकांना अ. क्र. १८ मध्ये उल्लेखित पत्त्यावर दि. २९.०५.२०२३ रोजी किंवा त्यापूर्वी वितरित करावी. |
| १५. | निर्णय घेणारे अधिकारी यांना मंजुरीकरिता ठराव योजना सादर करण्याकरिता अंदाजित दिनांक | सीओसी द्वारे निर्णय घेण्यात येईल परंतु १९ जुलै, २०२३ पूर्वी. |
| १६. | ठराव व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | **प्रशांत जैन** **नोंद. क्र.** IBBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131 |
| १७. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, ठराव व्यावसायिकाचे नाव, पत्ता आणि ईमेल | **प्रशांत जैन** नोंद. पत्ताः ए५०१, शांती हाईट्स, प्लॉट क्र. २, ३, ९, बी/१०, सेक्टर ११, कोपरखैरणे, ठाणे, नवी मुंबई, महाराष्ट्र - ४०० ७०९. नोंद. ई-मेलः ipprashantjain@gmail.com |
| १८. | ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल | **पत्रव्यवहाराचा पत्ताः** स्सार्वी रेझॉल्यूशन सर्व्हिसेस एलएलपी-आयपीई, बी६१०, बीएसईएल टेक पार्क, सेक्टर ३०ए, वाशी रेल्वे स्टेशनसमोर, वाशी, नवी मुंबई - ४००७०३. पत्रव्यवहाराचा ई-मेलः sudal.ppirp@gmail.com |
| १९. | अधिक तपशील येथे किंवा यांच्याकडे उपलब्ध | sudal.ppirp@gmail.com येथे ईमेल पाठवून ठराव व्यावसायिकांकडून तपशील प्राप्त करता येतील. |
| २०. | फॉर्म प्रसिद्धीचा दिनांक | १३.०५.२०२३ |

सही/-
दिनांकः १३.०५.२०२३
ठिकाणः मुंबई
**श्री. प्रशांत जैन**
**नोंद क्र.** IBBI/IPA-001/IP-P01368/2018-2019/12131
नोंद. पत्ताः ए५०१, शांती हाईट्स, प्लॉट क्र. २, ३, ९, बी/१०, सेक्टर ११, कोपरखैरणे, ठाणे, नवी मुंबई, महाराष्ट्र - ४०० ७०९.

थोडक्यात...

## मनपा कर उपायुक्तपदी पवार

**नाशिक ।** नाशिक महापालिकेच्या करवसुलीत घरपट्टीची १८८ कोटींची



विक्रमी वसुली करत नवा इतिहास रचणाऱ्या उपायुक्त (कर) अर्चना तांबे यांची अखेर बदली झाली. कर उपायुक्तपदी शासन प्रतिनियुक्तीने राज्य कर सहाय्यक आयुक्त (वर्ग १) श्रीकांत पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पवार यांनी गुरुवारी (दि. ११) उपायुक्त (कर) पदाची सूत्रे स्वीकारली. करवसुली विभागाची विस्कटलेली घडी बसवण्यात तांबे यांचा मोठा वाटा आहे.

## आज माजी गुणवंत विद्यार्थी सत्कार

**पंचवटी ।** पद्मश्री कै. देवराम सयाजी वाघ तथा कर्मवीर काकासाहेब वाघ यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालय, तंत्रनिकेतन व शाळा यांचे १२५ माजी गुणवंत विद्यार्थ्यांचा शनिवारी (दि.१३) दुपारी चार वाजता महाकवी कालिदास कलामंदिर, शालिमार चौक, नाशिक येथे सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. आर. एस. माळी तर अतिथी म्हणून हिरामण आहेर हे उपस्थित राहणार आहेत. हे १२५ माजी विद्यार्थी देशातच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवरही ज्ञानाचा ठसा उमटवत संस्थेचा नावलौकिक वाढवण्यात मोलाची कामगिरी केली आहे. अशा सर्व माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्याबाबत संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ यांनी पुढाकार घेत मार्गदर्शन केले. सत्कार समारंभास उपस्थित राहण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. के. एन. नांदुरकर व प्राचार्य प्रा. पी. टी. कडवे यांनी केले आहे.

## उफाडे यांना पुरस्कार

**नाशिक ।** महाराष्ट्रामध्ये विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या तरुणांना



संजीवनी फाऊंडेशन संगमनेर यांच्यामार्फत दरवर्षी शिवछत्रपती महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान करण्यात येतो. यावर्षी हा पुरस्कार दिंडोरी तालुक्यातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष, शेतकरी चळवळीतील युवा नेतृत्व संदीप उफाडे यांना जाहीर झाला आहे. १ जून रोजी महाराष्ट्रातील मान्यवरांच्या हस्ते संदीप उफाडे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. संदीप उफाडे हे अनेक वर्षे शेतकरी चळवळीमध्ये सातत्याने काम करत आहेत. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर वाचा फोडून रस्त्यावरची लढाई लढण्यात ते अग्रभागी असतात. शेतकरी हिताच्या कार्याची दखल घेऊन त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात येणार आहे. त्यांना हा पुरस्कार मिळाल्याबद्दल स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी, प्रदेशाध्यक्ष संदीप जगताप यांच्यासह दिंडोरी तालुक्यातील अनेक मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले आहे.

## परिचारिका दिनानिमित्त रक्तदान

**नाशिक ।** मविप्र संचलित परिचर्या शिक्षण संस्थेत सालाबादाप्रमाणे



जागतिक परिचारिका दिनाचे औचित्य साधून आज डॉ. वसंतराव पवार मेडिकल कॉलेज हॉस्पिटलच्या रक्तदान पेढीच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिर झाले. प्राचार्या पौर्णिमा नाईक आणि मविप्र रुग्णालय रक्तपेढीच्या विभागप्रमुख डॉ. अर्चना पाटील यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून आपली सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न केला. एकूण ३० युनिटचे संकलन या शिबिरात करण्यात आले. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. रक्तदानाचे महत्त्व प्राचार्या नाईक यांनी पटवून दिले. सदर शिबिराचे आयोजन महाविद्यालयाच्या शिबिर समन्वयक नेहा कटारे, मोनिका भारती यांनी केले. शिबिराच्या शेवटी रक्तपेढीकडून डॉ. उज्ज्वल पाटील व विभागप्रमुख डॉ. अर्चना पाटील यांनी उपप्राचार्या नूतन कुमारी यांचा प्रमाणपत्र आणि ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला.

## आयुर्वेद महाविद्यालयाचे चिकित्सा शिबिर

**नाशिक ।** आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालयाच्या कार्यचिकित्सा विभागातर्फे चेहऱ्यावरील सुरकुत्या तपासणी व चिकित्सा शिबिर १५, १६, १७ मे रोजी होणार आहे. आधुनिक यंत्राद्वारे तपासणी व चिकित्सा देण्यात येईल. तसेच विशेष आहार सल्ला याबाबत प्रबोधन करण्यात येईल. कपाळावर, डोळ्यांभोवती सुरकुत्या पडणे, त्वचा कोरडी व निस्तेज होणे, संपूर्ण चेहऱ्यावर सुरकुत्या पडणे या रुग्णांनी याचा लाभ घ्यावा. सर्व रुग्णांना औषधे माफक दरामध्ये व दिनचर्या, विशेष आहार, व्यायाम याबाबत मार्गदर्शन करण्यात येईल, असे प्राचार्य विनय सोनांबेकर, अधीक्षक पंकज दीक्षित, शिवानी धुरगुडे, एकनाथ कुलकर्णी, संजीवनी राठोड, शोभना नागपुरे, पूजा सोनवणे यांनी कळवले आहे.


**नाशिक महानगरपालिका, नाशिक**
**वृक्षप्राधिकरण**
**महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ चे कलम ८ (३) अन्वये**

**जाहिर नोटीस**

नाशिक महानगरपालिका हद्दितील नवीन नाशिक विभागाअंतर्गत धोकादायक, वाळलेले व बांधकाम बाधित वृक्ष तोडणे/ पुर्णरोपण / छाटणी बाबत वर नमुद अधिनियमातील कलम ८ (२) अन्वये वृक्षप्राधिकरणाकडे लेखी अर्ज सादर करणेत आले आहेत.

त्याचप्रमाणे नाशिक महानगरपालिकेच्या हद्दितील नवीन नाशिक मनपा मालकीच्या रस्त्याच्या कडेची धोकादायक रहदारीस अडथळा ठरणारी, विद्युत पथदिव्यांना व सिग्नलला अडथळा ठरणारी वृक्षांची छाटणी बाबत वर नमुद अधिनियमातील ८ (२) अन्वये वृक्ष प्राधिकरणाकडे लेखी अर्ज सादर करण्यात आले आहेत.

ज्या अर्थी, वृक्ष प्राधिकरणाकडे व वृक्ष अधिकारी यांचेकडे प्राप्त झालेल्या अर्जाबाबत अधिनियमातील कलम ८ (३) अन्वये स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन कमाल ०७ (सात) दिवस कालावधी मध्ये हरकती तथा सुचना मागविणेचे सुचित केले आहे. त्याअनुषंगाने अधिनियमातील अटी व शर्ती अधिन राहून प्राप्त अर्जाची छाननी झाल्यानंतरच त्याबाबतचा प्रस्ताव **मा. वृक्ष प्राधिकरण सभा ठराव ३९ दिनांक २४/१२/२०१९ अन्वये** त्याबाबतच्या अहवालासह वृक्ष अधिकारी नवीन नाशिक यांनी प्रस्ताव तयार केले आहे. सदरचे प्रस्ताव नवीन नाशिक विभागीय कार्यालय उद्यान विभागात उपलब्ध असून प्रस्तुत प्रकरणी हरकती तथा सुचना असल्यास लेखी स्वरुपात नवीन नाशिक विभागीय कार्यालय येथे जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ७ (सात) दिवसांचे मुदतीत दयाव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

जनसंपर्क/जा.क्र./६१
दि.१२/५/२०२३.

सही /-
वृक्ष अधिकारी तथा विभागीय अधिकारी,
न.ना विभागीय कार्यालय
नाशिक महानगरपालिका, नाशिक,

मुलगा-मुलगी भेद नको, मुलगी झाली खेद नको.


# आदिवासींच्या गरजेनुसार योजनांची अंमलबजावणी

## डॉ. गावित : संशोधन केंद्र इमारतीचे भूमिपूजन

**नाशिक । दि. १२ प्रतिनिधी**

आदिवासी बांधवांच्या सक्षमीकरणासाठी आदिवासी विकास विभागामार्फत विविध योजना राबवल्या जातात. आगामी काळात आदिवासी बांधवांच्या आवश्यक गरजा लक्षात घेऊन योजनांची अंमलबजावणी करण्यात येईल, असे प्रतिपादन राज्याचे आदिवासी विकासमंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी केले.

नाशिक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पअंतर्गत मखमलाबाद येथे स्वीकार तथा संशोधन केंद्र इमारतीच्या भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी मंत्री डॉ. गावित बोलत होते. यावेळी विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, आ. हिरामण खोसकर, राहुल ढिकले, आदिवासी विकास आयुक्त लीना बनसोड, आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त तुषार माळी, संदीप गोलाईत, आदिवासी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता विजय पाटील, कार्यकारी अभियंता एस. एस. सांगळे, नाशिक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी जतिन रहमान उपस्थित होते.

गावित म्हणाले, रोजगाराच्या शोधात येणारे मजूर व इतर विविध कामांसाठी आदिवासी बांधव शहरात येत असतात. त्यांच्या निवाऱ्याची सोय होण्यासाठी या स्वीकार तथा संशोधन केंद्राचा उपयोग होणार होणार आहे. या केंद्रात तात्पुरत्या निवाऱ्यासोबतच मजुरांना भोजन तयार करण्यासाठी व्यवस्थाही करण्यात यावी, या संशोधन केंद्राप्रमाणे शहरातील विविध भागात कामानिमित्त येणाऱ्या आदिवासी बांधव, मजूर व विद्यार्थ्यांसाठी निवारागृहे उभारण्यासाठी सर्वेक्षण करून स्थळे निश्चित करण्यात यावी. तसेच शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीही वसतिगृहांची संख्या वाढवण्याबाबत नियोजन करण्यात यावे. त्याचप्रमाणे 'ड' यादीत नसलेल्या आदिवासी बांधवांना येणाऱ्या काळात शंभर टक्के घरे देण्यासाठी शासनस्तरावर नियोजन करण्यात येत आहे. आदिवासी बांधवांच्या विकासाच्या दृष्टीने आदिवासी विकास विभागाच्या योजना वाढवणे तसेच शिक्षण पद्धतीत आमूलाग्र बदल घडवण्यासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे डॉ. गावित यांनी सांगितले.



### निवाऱ्यासोबत सुरक्षिततेच्या उपाययोजना महत्त्वाच्या

आदिवासी बांधव शिक्षण व रोजगारानिमित्त शहरात येत असतात. त्यावेळी त्यांच्या निवाऱ्याच्या व्यवस्थेसोबतच त्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन सजगता बाळगण्याबाबत उपाययोजना व प्रबोधन होणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी आदिवासी विकास विभागाने पुढाकार घेऊन प्रयत्नपूर्वक नियोजन करावे, असे विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनी यावेळी सांगितले. प्रास्ताविक आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त संदीप गोलाईत यांनी केले.

## स्वानंद बेदरकर यांचे उद्या व्याख्यान

**नाशिक ।** मैत्रविश्व आणि दक्ष नागरिक मंच या दोन संस्थांच्या संयुक्त



विद्यमाने अमृतवक्ता स्वानंद बेदरकर यांचे रविवारी (दि.१४) संध्याकाळी ६ वाजता राष्ट्राभिमानी लोकमान्य या विषयावर हे व्याख्यान होईल. भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाल्याने स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. मैत्रविश्व आणि दक्ष नागरिक मंच यांच्या वतीने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. लोकमान्य टिळक आणि त्यांचा काळ, त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि स्वातंत्र्यलढ्यात त्या संपूर्ण लढ्याचे एक काळ त्यांनी केलेले नेतृत्व या सगळ्याचा उहापोह या व्याख्यानात बेदरकर आपल्या अमोघ वाणीद्वारे करणार आहेत. गंगापूररोडवरील शंकराचार्य न्यासाच्या डॉ. कुर्तकोटी सभागृहात होणाऱ्या या व्याख्यानाचा लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहन मैत्रविश्व आणि दक्ष नागरिक मंच यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## ४२ अनुकंपा उमेदवारांना नेमणूकपत्र वाटप

**नाशिक ।** जिल्ह्यातील विविध विभागांच्या अनुकंपा प्रतीक्षा सूचीतील पात्र उमेदवारांना अनुकंपा तत्त्वावर मिळालेल्या नियुक्ती ओदशांच्या माध्यमातून उमेदवारांनी आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडून नागरिकांना न्याय मिळण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा जिल्ह्याचे पालकमंत्री दादा भुसे यांनी व्यक्त केली.

जिल्हाधिकारी कार्यालयात अनुकंपा भरती २०२३ नियुक्ती आदेश वाटपाच्या आयोजित कार्यक्रमात भुसे बोलत होते. यावेळी अपर जिल्हाधिकारी बाबासाहेब पारधे, उपजिल्हाधिकारी नितीन मुंडावरे, जिल्हा पुरवठा



अधिकरी रमेश मिसाळ यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. जिल्ह्यात अनुकंपा तत्त्वावर फेब्रुवारी ते ११ मे २०२३ या कालावधीत साधारण ४४९ अनुकंपा नियुक्ती आदेशांचे वाटप करण्यात आले. जिल्हा पुरवठा कार्यालय, नाशिक-१२, उपसंचालक भूमी अभिलेख नाशिक, प्रदेश नाशिक-१३, अधीक्षक अभियंता, आधार सामग्री पृथ्थकरण मंडळ नाशिक -१, अधीक्षक अभियंता, धरण सुरक्षितता संघटना, नाशिक-२, सहजिल्हा निबंधक वर्ग-१ नाशिक-१, अधीक्षक अभियंता, (प्रशासन) मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना नाशिक-१, अपर आयुक्त आदिवासी विकास नाशिक-२, सहसंचालक, लेखा व कोषागारे नाशिक विभाग नाशिक-३, आयुक्त महानगरपालिका मालेगाव-१, नगरपरिषद इगतपुरी-३, नगरपरिषद येवला-२, नगरपरिषद, त्र्यंबक-१ असे नियुक्ती आदेशांचे वाटप करण्यात आले.

## आज तालाभिषेक बैठक

**नाशिक । दि. १२ प्रतिनिधी**

पवार तबला अकादमी आणि अल्पारंभ एज्युकेशनल अ‍ॅण्ड कल्चरल फाऊंडेशन आयोजित कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या सहकार्याने आयोजित उपक्रमातील तिसऱ्या बैठकीचे शनिवारी (दि.१३) सायं. ६ वा. विशाखा सभागृह, कुसुमाग्रज स्मारक, गंगापूररोड येथे आयोजन करण्यात आले आहे.

जानेवारी महिन्यात प्रथमच 'तालाभिषेक बैठक' या छोटेखानी संगीत मैफलीचे आयोजन करण्यात आले. दर दोन महिन्यातून या बैठकीचे आयोजन करण्यात येते. शनिवारी होणाऱ्या या बैठकीमुळे नवोदित तसेच प्रथितयश गायक व वादकांची कला जवळून अनुभवण्याची संधी संगीत रसिकांना मिळणार आहे. या मैफलीत नाशिकचे युवा गायक





आणि प्रा. अविराज तायडे व पं. उल्हास कशाळकर यांचे शिष्य आरोह ओक यांचे शास्त्रीय गायन होणार आहे.

कार्यक्रमाचे संयोजन अल्पारंभ एज्युकेशनल अ‍ॅण्ड कल्चरल फाऊंडेशन संस्थेतर्फे करण्यात आले असून या कार्यक्रमास प्रवेश सर्वांसाठी खुला आहे. तरी नाशिककर रसिकांनी या मैफलीचा आस्वाद घ्यावा, असे आवाहन पवार तबला अकादमीचे संचालक नितीन पवार, एस. डब्ल्यू. एस. फायनान्शियल सोल्युशन प्रा. लि. चे संचालक रघुवीर अधिकारी आणि कुसुमाग्रज प्रतिष्ठान यांनी केले आहे.

## निमा पॉवर एक्झिबिशन जागेचे आज भूमिपूजन

**नाशिक । दि. १२ प्रतिनिधी**

दि. १९ ते २२ मेदरम्यान सातपूरच्या आयटीआय मैदानावर आयोजित निमा पॉवर एक्झिबिशनच्या जागेचे भूमिपूजन शनिवारी (दि.१३) सकाळी १० वाजता होत असून त्यानंतर डोम उभारणीच्या कामास वेग येईल, अशी माहिती निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे आणि एक्झिबिशन कमिटीचे चेअरमन मिलिंद राजपूत व संयोजन समिती यांनी दिली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस आयुक्त अंकुश शिंदे, आमदार सीमा हिरे, तंत्रशिक्षणच्या कौशल्य विभागाचे सहसंचालक प्रफुल्ल वाकडे, व्यवसाय रोजगारचे सहसंचालक रवींद्र मुंडासे, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी नितीन गवळी उपस्थित राहणार आहेत. प्रदर्शनात सव्वादोनशेहून अधिक स्टॉल्स उभारण्यात येणार आहेत. उद्घाटन सोहळ्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उद्योगमंत्री उदय सामंत, पालकमंत्री दादा भुसे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

रांजणगावच्या धर्तीवर नाशकातही इलेक्ट्रिकल-इलेक्ट्रॉनिक क्लस्टर उभारण्याचे स्वप्न या प्रदर्शनामुळे साकार होईल, असा विश्वास बेळे यांनी व्यक्त केला. प्रदर्शनाच्या यशस्वीततेसाठी निमाचे सरचिटणीस राजेंद्र अहिरे, उपाध्यक्ष किशोर राठी, आशिष नहार, खजिनदार विरल ठक्कर, हर्षद ब्राह्मणकर, नितीन वागस्कर, शशांक मणेरीकर, प्रवीण वाबळे, किरण वाजे, दिलीप वाघ, कैलास पाटील, गोविंद झा, संदीप भदाणे, जयंत जोगळेकर, रवींद्र झोपे, राजेंद्र वडनेरे, विराज गडकरी, संजय राठी, हेमंत खोंड, वैभव जोशी प्रयत्नशील आहेत.


**फॉर्म पी ११**
**संकल्प योजनांसाठी आमंत्रण**
**दिवाळखोरी आणि दिवाळखोरी (प्री-पॅकेज्ड दिवाळखोरी रिझोल्यूशन प्रक्रिया) विनियम, २०२१ च्या नियमन ४३ अंतर्गत**

| संबंधित तपशील | | |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | **सुदाल इंडस्ट्रीज लिमिटेड** |
| २ | पूर्वीचे नाव बदलल्यासगेल्या दोन वर्षांत | एन.ए. |
| ३ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या समावेशाची तारीख | ०८-०८-१९७९ |
| ४ | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदार अंतर्भूत/नोंदणीकृत आहे | आरओसी-मुंबई |
| ५ | ओळख क्रमांक | L21541MH1979PLC021541 |
| ६ | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि मुख्य कार्यालयाचा पत्ता (असल्यास). | **नोंद. कार्यालय:** ए-५, एमआयडीसी, अंबड औद्योगिक क्षेत्र, मुंबई-नाशिक महामार्ग, नाशिक - ४२२ ०१०, महाराष्ट्र, भारत **कॉर्पोरेट ऑफिस:** २६ए, नरिमन भवन, २२७ नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१ महाराष्ट्र, भारत |
| ७ | प्री-पॅकेज्ड दिवाळखोरी सुरू होण्याची तारीख | २०-०४-२०२३ (२०-०४-२०२३ चा ऑर्डर २२-०४-२०२३ रोजी अधोस्वाक्षरीद्वारे प्राप्त झाला) |
| ८ | रिझोल्यूशन प्लॅनसाठी आमंत्रणाची तारीख | १३.०५.२०२३ |
| ९ | रिझोल्यूशन अर्जदारांसाठी पात्रता | पात्रता निकष येथे उपलब्ध आहेत: सीडी च्या वेबसाइट: http://sudal.co.in/ आयपीईची वेबसाइट: http://ssarvi.com/running-cases.php |
| १० | अपात्रतेचे निकष लागू कलम २९अ अंतर्गत | दिवाळखोरी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ च्या कलम २९ए आर/डब्ल्यु कलम २४०ए नुसार |
| ११ | मूल्यमापनाचा आधार (महत्त्वपूर्ण सुधारणा आणि टिक आकाराशी संबंधित तपशीलांसह) | मूल्यांकनासाठी तपशीलवार आधार रिजोल्यूशन प्रोफेशनलकडून ईमेल पाठवून प्राप्त केला जाऊ शकतो: sudal.ppirp@gmail.com |
| १२ | आमंत्रण मिळविण्याची पद्धतसंकल्प योजना, मूल्यमापनाचा आधार (महत्त्वपूर्ण सुधारणा आणि टिक आकाराशी संबंधित तपशीलांसह), माहिती ज्ञापन आणि पुढील माहिती | कागदपत्रे रिजोल्यूशन प्रोफेशनलकडून इमेल पाठवून मिळवता येतात: sudal.ppirpgmail.com, पात्रता निकषांमध्ये नमूद केलेल्या अटी पूर्ण करण्याच्या अधीन. |
| १३ | ठराव योजना सादर शेवटची तारीख | २९.०५.२०२३ |
| १४ | ठराव सादर करण्याची पद्धत व्यावसायिक निराकरण करण्याची योजना | २९.०५.२०२३ रोजी किंवा त्यापूर्वी क्र. १८ मध्ये नमूद केलेल्या पत्त्यावर रिझोल्यूशन प्रोफेशनलला शोधण्यायोग्य स्वरूपात (पासवर्ड-संरक्षित) सॉफ्ट कॉपीसह सीलबंद कव्हरमधील भौतिक प्रत वितरित केली जाईल. |
| १५ | रिझोल्यूशन योजना निर्णायक प्राधिकरणाकडे मंजुरीसाठी सादर करण्याची अंदाजित तारीख | सीओसी द्वारे निर्णय घेतला जाईल परंतु १९ जुलै २०२३ पूर्वी |
| १६ | रिझोल्यूशन व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणी क्रमांक | प्रशांत जैन Regd. No. IBBI/IPA-001/P-P01368/2018-2019/12131 |
| १७ | बोर्डाकडे नोंदणीकृत रिझोल्यूशन व्यावसायिकाचे नाव, पत्ता आणि ई-ईमेल | **प्रशांत जैन** **नोद.पत्ता:** ए५०१, शांती हाइट्स, प्लॉट क्रमांक २,३,९, ब/१०, सेक्टर ११, कोपरखैराणे, ठाणे, नवी मुंबई, महाराष्ट्र- ४०० ७०९ **नोंद. ई-मेल:** ipprashantjain@gmail.com |
| १८ | रिझोल्यूशन व्यावसायिकांशी पत्रव्यवहार करण्यासाठी वापरायचा पत्ता आणि ईमेल | **पत्रव्यवहार पत्ता:** एसएसएआरव्हीआय रिझोल्यूशन सर्व्हिसेस एलएलपी-आयपीई, बी ६१०, बीएसईएल टेक पार्क, सेक्टर ३०अ, वाशी रेल्वे स्टेशन समोर, वाशी, नवी मुंबई-४००७०३ **पत्रव्यवहार ई-मेल:** sudal.ppirp@gmail.com |
| १९ | अधिक तपशील उपलब्ध येथे किंवा सह आहेत | तपशील रिजोल्यूशन प्रोफेशनलकडून ईमेल पाठवून प्राप्त केला जाऊ शकतो: sudal.ppirp@gmail.com |
| २० | फॉर्मच्या प्रकाशनाची तारीख | १३.०५.२०२३ |

तारीख: १३.०५.२०२३
ठिकाण: मुंबई

सही/-
**श्री. प्रशांत जैन**
Regd. No. IBBI/IPA-001/P-P01368/2018-2019/12131
**नोद.पत्ता:** ए५०१, शांती हाइट्स, प्लॉट क्रमांक २,३,९, ब/१०, सेक्टर ११, कोपरखैराणे, ठाणे, नवी मुंबई, महाराष्ट्र- ४०० ७०९



**महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम ६० अन्वये अधिमंडळाची विशेष बैठकीची सूचना**
**( फक्त सभासदांकरीता )**

दि नासिक इंडस्ट्रिअल को-ऑप. इस्टेट लि. नाशिक ( नाईस ) या सहकारी संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची अधिमंडळाची विशेष बैठक श्री. कैलास आढाव, प्राधिकृत अधिकारी तथा सहायक सहकारी अधिकारी अधिन उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक तालुका, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २७/०५/२०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता दि नासिक इंडस्ट्रिअल को-ऑप इस्टेट लि. (नाईस) आय. टी. आय सिग्नल जवळ, भू.क्र.अ-९, नाईस संकुल, नाईस हॉल, सातपूर, नाशिक येथे पुढील कामकाजाकरीता बोलाविण्यात येत आहे. तरी कृपया सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

**सभेचा विषय** - दि नासिक इंडस्ट्रिअल को-ऑप. इस्टेट लि. ( नाईस ) या सहकारी संस्थेचे व्यवस्थापन समितीचे निवडणुकीसाठी सन २०२३ ते २०२८ कालावधीसाठी उपविधीतील तरतूद / कलम क्र.३८ व ४० (अ) अन्वये १४ जागांसाठी निवड करणे.

( मा. प्राधिकृत अधिकारी यांचे मान्यतेने )
दिनांक :- १२/०५/२०२३

**व्यवस्थापक**
**दि नासिक इंडस्ट्रिअल को-ऑप इस्टेट लि. नाशिक**

प्रति,
मा. सभासद, दि नासिक इंडस्ट्रिअल को-ऑप इस्टेट लि. नाशिक
प्रत- : मा. तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक तालुका, नाशिक



**PUBLIC NOTICE**

NOTICE is hereby given that the below mentioned Sub Broker / Authorised Person is no longer affiliated as Sub Broker / Authorised Person of Kotak Securities Limited.

| Sub Broker/ Authorised Person Name | Trade Name | Exchange Registration Numbers of Sub Broker / Authorised Person | Address of Sub Broker/ Authorised Person |
|---|---|---|---|
| RANJIT RAJENDRA DESHMUKH | RANJIT RAJENDRA DESHMUKH | NSE - AP0291560551<br>MCX - 158974 | Flat No 5 Survey No 726 Grandeur Apartment College Road Yeolekar Mala Nashik 422005 |

Please note that above mention Sub Broker (SB)/Authorised Person (AP) is no longer associated with us. Any person henceforth dealing with above mention SB/AP should do so, at their own risk. Kotak Securities Ltd. shall not be liable for any such dealing. In case of any queries for the transactions till date, Investors are requested to inform Kotak Securities Ltd. within 15 days from the date of this notification, failing which it shall be deemed that there exists no queries against the above mentioned SB/AP.

kotak Kotak Securities Kotak Securities Limited. Registered Office: 27 BKC, C 27, G Block, Bandra Kurla Complex, Bandra (E), Mumbai 400051. CIN: U99999MH1994PLC134051, Telephone No.: +22 43360000, Fax No.: +22 67132430. Website: www.kotak.com / www.kotaksecurities.com. Correspondence Address: Infinity IT Park, Bldg. No 21, Opp. Film City Road, A K Vaidya Marg, Malad (East), Mumbai 400097. Telephone No: 42856825. SEBI Registration No: INZ000200137 (Member of NSE, BSE, MSE, MCX & NCDEX), AMFI ARN 0164, PMS INP000000258, and Research Analyst INH000000586. NSDL/CDSL: IN-IN-DP-629-2021. Compliance Officer Details: Mr.Sandeep Gupta Call: 022 - 4285 8484, or Email: ks.compliance@kotak.com.



**नमुना झेड**
**(विषय १०७) पोट नियम (११(ड-११)पहा)**
**स्थावर मालमत्तेचा ताबा घेणेबाबतची नोटीस**

ज्याअर्थी खाली सही केलेल्या मे. वसुली अधिकारी श्री. पी. एस. पगार, महाराष्ट्र सहकारी संस्था ९१/१०१ अन्वये सहकार न्यायालय/उपनिबंधक नाशिक, अर्जदार श्री. परशुराम नागरी सहकारी पतसंस्था मर्या., गोळे कॉलनी, नाशिक अन्वये मागणी नोटीस ऋणको श्री. हितेश विजय बाफणा यांना देऊन नोटीसीमध्ये नमुद केलेली रक्कम रु.४८१५८१/- (अक्षरी रक्कम रु. चार लाख एक्क्याऐंशी हजार पाचशे एक्क्याऐंशी मात्र) दिनांक ३१/०९/२०२० यापासून १५% व्याज याप्रमाणे सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून आणि ऋणको यांनी रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे. खालील सही करणाऱ्याने दि. १७/०२/२०२२ रोजी जप्तीची नोटीस दिली असून पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसुर केल्यामुळे ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येते आहे. आणि सर्व नागरिकांना खालील निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खालील सही करणार यांनी त्याला/तिला म.स.सं.नियम १९६१ मधील नियम १०७/११ (ड-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार या दिवशी दिनांक १२/५/२०२३ यावर्षी ताबा घेतला आहे.

विशेष करुन ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की सदर मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास अर्जदार श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था मर्या., गोळे कॉलनी, नाशिक यांच्या बोजाची रक्कम रु.४८१५८१/- (अक्षरी रक्कम रु.चार लाख एक्क्याऐंशी हजार पाचशे एक्क्याऐंशी मात्र) आणि त्यावरील व्याज रु. १३९९०६/- (अक्षरी रक्कम रु. एक लाख एकोणचाळीस हजार नऊशे सहा मात्र) याला अधिन रहावे लागेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन:-**

ता.जि. नाशिक पैकी मौजे नाशिक महानगरपालिका हद्दीतील गोविंदनगर प्लॉट नं. ५+६+७+८ संगित रेसीडेन्सी अपार्टमेंट, तिसरा मजला फ्लॅट नं. १५ ए बांधीव क्षेत्र ६२.६३ चौ.मी. टेरसचे क्षेत्र ४.६४ चौ.मी. यांसी चतुःसीमा रेकॉर्डप्रमाणे, दिनांक : १२/५/२०२३. ठिकाण : नाशिक.

**पी. एस. पगार**
**विशेष वसुली अधिकारी**
(महा. सह. कायदा १९६० चे कलम १५६ अन्वये अधिकार प्राप्त) नाशिक जिल्हा सहकारी पतसंस्थांचे सह फेडरेशन लि. नाशिक द्वारा: श्री परशुराम नागरी सहकारी पतसंस्था मर्या गोळे कॉलनी, नाशिक, ता. जि. नाशिक.



**नमुना झेड**
**(विषय १०७) पोट नियम (११(ड-११)पहा)**
**स्थावर मालमत्तेचा ताबा घेणेबाबतची नोटीस**

ज्याअर्थी खाली सही केलेल्या मे. वसुली अधिकारी श्री. पी. एस. पगार, महाराष्ट्र सहकारी संस्था ९१/१०१ अन्वये/सहकार न्यायालय/उपनिबंधक नाशिक, अर्जदार नाशिकरोड नागरी सहकारी पतसंस्था मर्या., नाशिकरोड, ता. जि. नाशिक अन्वये मागणी नोटीस ऋणको श्री. प्रशांत शंकर पवार, संमतीदार श्री. शंकर राधाकिसन पवार यांना देऊन नोटीसीमध्ये नमुद केलेली रक्कम रु. १५३२७२३/- (अक्षरी रक्कम रु. पंधरा लाख बत्तीस हजार सातशे तेवीस मात्र) दिनांक ०१/०९/२०२१ पासुन १३% व्याज याप्रमाणे सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून आणि ऋणको यांनी रक्कम जमा करण्यास कसुर केली आहे. खालील सही करणाऱ्याने दि. १२/०९/२०२२ रोजी जप्तीची नोटीस दिली असून पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसुर केल्यामुळे ऋणकोला याप्रमाणे नोटीस देण्यात येते आहे. आणि सर्व नागरिकांना खालील निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खालील सही करणार यांनी त्याला/तिला म.स.सं. नियम १९६१ मधील नियम १०७/११ (ड-१) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार या दिवशी दिनांक १२/०५/२०२३ यावर्षी ताबा घेतला आहे.

विशेष करून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की सदर मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करु नये आणि व्यवहार केल्यास अर्जदार नाशिकरोड नागरी सहकारी मर्या., नाशिकरोड, ता. जि. नाशिक यांच्या बोजाची रक्कम रु. १५,३२,७२३/- (अक्षरी रक्कम रु. पंधरा लाख बत्तीस हजार सातशे तेवीस मात्र) आणि त्यावरील व्याज रु. ३,२७,९६२/- (अक्षरी रक्कम रु. तीन लाख सत्तावीस हजार नऊशे बासष्ट मात्र) याला अधिन रहावे लागेल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन :-**

तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी ता.नाशिक पैकी नाशिक महानगरपालिका हद्दीतील अमृतधाम परिसरातील **सर्व्हे नं. २००/६/२ पैकी प्लॉट क्र. ०१, ०२ व प्लॉट क्र. ०३** वरील **अष्टविनायक को. ऑप. हौसिंग सोसायटी** मधील **रो हाऊस नं. ०९ यांसी क्षेत्र २४१.०० चौ. फुट म्हणजेच २२.४० चौ.मी. व रो-हाऊस नं. १०, यांसी क्षेत्र २४१.०० चौ. फुट २२.४० चौ. मी. व मागील व पुढील मोकळी जागा ५.६ चौ.मी.** येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत यांसी चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईटसप्रमाणे. दिनांक : १२/०५/२०२३. ठिकाण : नाशिकरोड.

**पी. एस. पगार**
**विशेष वसुली अधिकारी**
(महा. सह. कायदा १९६० चे कलम १५६ अन्वये अधिकार प्राप्त) नाशिक जिल्हा सहकारी पतसंस्थांचे सह फेडरेशन लि. नाशिक द्वारा:नाशिकरोड नागरी सहकारी पतसंस्था मर्या., नाशिकरोड, ता. जि. नाशिक.